# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर, 2018

01671

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***सूचना :*** ***सर्व*** *प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

   (a) स्मार्ट सिटीची संकल्पना

   (b) नोटाबंदीचे परिणाम

   (c) पर्यटनाचे फायदे

   (d) मला आवडलेले पुस्तक

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

   (a) तुकाराम महाराजांनी संतांच्या जीवनाचे कार्य कोणते असल्याचे सांगितले आहे ?

   (b) केशवसुतांच्या दृष्टीने कविप्रतिभेचे कार्य कोणते ?

   (c) मर्ढेकरांच्या कवितेची पृथगात्म वैशिष्ट्ये कोणती ?

   (d) 'कातरवेळ' या कथेच्या नावाची सार्थता स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) 'वळीव' कथेत तात्याच्या तांब्याच्या अंगठीचा प्रसंग कोणकोणत्या गोष्टी अधोरेखित करतो ?

(b) प्रल्हादला चेलम्याचा प्रसंग आणि धाकट्या बहिणीचे 'चल-मा' म्हणून घरी नेणे हे दोन्ही सारखेच का वाटतात ?

(c) आकाश आणि कृष्ण यांच्यात शिरवाडकरांना कोणते साम्य आढळून येते ?

(d) 'सांबर मारणे' आणि 'सांबर करणे' यातील मूल्यभावात असलेला संघर्ष कोणता ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : 6

(a) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेत वैद्यकीय पेशाचे व्यवहारिक स्वरूप कसे दर्शविले आहे ?

(b) 'आनंद देण्याचे अविनाशी सामर्थ्य हीच अक्षर वाङ्मयाची खरी कसोटी होय' असे ना.सी. फडके का म्हणतात ?

(c) लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी आपण काय केले पाहिजे असे डॉ.आंबेडकर सांगतात ?

(d) लोकशाहीत नागरिकाला लाभणारे महत्त्वाचे अधिकार कोणते ?

5. मराठीतील शब्दांचे आठ प्रकार सांगून विशेषण आणि क्रियाविशेषण यांचे एक-एक उदाहरण वाक्यात वापर करून लिहा. 5

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) पाणी म्हणजेच जीवन

(b) वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

(c) जनसेवा हीच ईश्वरसेवा

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) नाकाने कांदे सोलणे

(b) उंटावरून शेळ्या हाकणे

(c) डोळ्यात धूळ फेकणे

(d) तोंडाला पाने पुसणे

(e) आकाश पाताळ एक करणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

(b) उथळ पाण्याला खळखळाट फार

(c) बडा घर पोकळ वासा

(d) एक ना धड भाराभार चिंध्या

(e) आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) भाऊराव पाटलांनी शिक्षणक्षेत्रात वसतिगृहाचे महत्त्व कसे जाणले ?

(b) समाजवादी व्यवस्था ही स्त्रियांच्या विकासासाठी कशी उपयुक्त आहे ?

(c) विज्ञानाने निर्माण केलेल्या प्रश्नांबाबत माणूस उदासीन का आहे ?

(d) निसर्ग मानवाची माता आहे असे का म्हणतात ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

During the early periods of Vedic civilization, a caste system did not exist in India. However there was a class system. In those days, people chose their professions based on their inclinations and skills. There were no rules or laws that prevented social mobility. Vedic society afforded equal opportunity to its members in every sphere of life.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

जो ज्ञान देतो तो गुरु. म्हणून आई हा आपला पहिला गुरु. तिनेच या जगात आणून आपल्याला त्याची पहिली ओळख करून दिली. आपल्याला बोलायला शिकविले. वडिलांनी व्यवहार ज्ञान आणि नीतिशिक्षण दिले. यानंतर आपल्याला ज्ञानाची वेगवेगळी क्षेत्रे दाखवितात ते आपले लौकिक गुरु. शिक्षक आपल्याला शिकवितात म्हणजे ज्ञानाची माहिती करून देतात. ज्ञानाचा अनुभव जे आणून देतात ते ग्रंथ आपल्या आयुष्यभराचे गुरु असतात. साऱ्या जगातले नानाविध क्षेत्रांतले ज्ञान, संशोधन, विचार आणि अनुभव ग्रंथामध्ये ग्रथित केलेला असतो. महाकाव्ये, ज्ञानविज्ञानाचे ग्रंथ या सर्वांमधून वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान साठविलेले असते. फार काय, कथा-कादंबऱ्यांमधूनही मानवी जीवनाचा अनुभवच प्रकट झालेला असतो. तेही एकप्रकारचे ज्ञानच असते. रामायण-महाभारत, गीतारहस्य, ज्ञानदेवी किंवा तुकारामांची गाथा, शेक्सपिअरची नाटके यांसारख्या ग्रंथांमधून ज्ञान आणि अनुभव ह्या दोन्हींची प्राप्ती होत असते.

---